# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक ०६/११/२०१७

***पोलीस - नक्षल चकमकीत ठार झालेल्या जहाल पुरुष नक्षलवादयाची ओळख पटली***

उपविभाग भामरागड अंतर्गत कोठी पोलीस मदत केंद्र कोपर्शी जंगल परीसरात नारायणपुर जिल्हयाच्या सीमेवर गडचिरोली पोलीस नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दिनांक ०२/११/२०१७ रोजी दुपारी ०४.३० ते ०५.०० वा. च्या दरम्यान पोलीस नक्षल चकमक झाली होती. या चकमकीमध्ये एक जहाल पुरुष नक्षलवादी ठार झाला होता. सदर मृत पुरुष नक्षलवादयाची आज ओळख पटविण्यात आली असून सदर मृत पुरुष नक्षलवादयाचे नाव विक्रम ऊर्फ शंकर कुमा तेलामी, वय- २८ वर्ष, रा. भैरमगड, ता. कोरचा, जि. नारायणपुर असे असून तो निबु कंपनीचा डेप्युटी कमांडर होता. विक्रम ऊर्फ शंकर कुमा तेलामी हा नक्षल दलममध्ये सुमारे १० वर्षापासून कार्यरत होता. त्याच्यावर १० लाखाचे बक्षिस होते. तो खून, जाळपोळ, चकमक अशा विविध गुन्हयांमध्ये सहभागी होता. सदर चकमकीनंतर जहाल पुरुष नक्षलवादयाच्या मृतदेहासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे.